**<u>मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८</u>**
**परताव्याबाबतच्या तरतुदीचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**क्रमांक – मुद्रांक – १०९/१०९९/प्र.क्र.६४१/म–१**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : २० फेब्रुवारी १९९१**

**<u>प्रस्तावना</u> :–**

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ५२ मधील तरतुदीनुसार, निरुपयोगी ठरलेले मुद्रांक कागद/विशेष चिकट मुद्रांक यांचा परतावा मंजुर करतांना जी वजातीची रक्कम काढण्यात येते ती बऱ्याच वेळा चुकीच्या पद्धतीने परिगणना (Calculate) केल्या जाते परिणामी वजावटीची कमी रक्कम वसूल केल्या जाते.

२. मुद्रांक कायद्यातील तरतुदीनुसार मुद्रांकाच्या किंमतीतून शेकडा २ रुपये किंवा प्रत्येक मुद्रांकास कागदास/चिकट मुद्रांकास रुपये १०/- यापैकी जी रक्कम जास्तीत जास्त असेल ती वजा करून अनुमत रक्कमेचा परतावा मंजूर करावयाचा असतो असे करताना प्रथम प्रत्येक मुद्राकांचे नग व किंमत लक्षांत घेऊन अशी जास्तीत जास्त वजातीची रक्कम काढली गेली पाहिजे. निव्वळ मुद्रांकाची एकूण संख्या/एकूण किंमत लक्षात घेऊ नये. कारण, अशा प्रकरणी संबंधितास ज्यादा रक्कमेचा परतावा मंजुर होण्याची शक्यता घेवू नये. कारण, अशा प्रकरणी संबंधितास ज्यादा रक्कमेचा परतावा मंजूर होण्याची शक्यता निर्माण होते. यास्तव असे चुकीचे परिगणना (Calculate) टाळण्यासाठी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ मधील अनुमत परताव्याबाबतच्या तरतुदीचे काटेकोरपणे कपालन करण्यात यावे.

३.    नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राजय, पुणे यांनी ह्या सुचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात.

**सही /-**
**(के.के.विरशीद)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**

**प्रति,**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे**

**सर्व उपनोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,पुणे**

**सर्व मुद्रांक अधिक्षक, मुंबई**

**सर्व सहजिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी**

**वित्त विभाग(व्य-१०)**

**निवड नस्ती म-१ कार्यालय**